ISSN : 2278-8204

International Monthly Research Journal For All Subjects

# AKSHARDEEP

■ Volume - II ■ Issue - I ■ July 2013



Editor
Ganpu Lahane

| | | |
|---|---|---|
| 22. व्यवहारातील म्हणी - मराठीभाषेचे सौदर्य | डॉ. दुष्यंत कटारे | 116 |
| 23. नाहिरेवाल्यांची पंढरी - माळेगाव यात्रा | प्रा. डॉ. कौसल्ये निवृत्ती | 120 |
| 24. जागतिकीकरणाचे कृषी क्षेत्रावरील दुष्परिणाम | प्रा. लटपटे नामदेव पुं. | 124 |
| 25. ऊस तोडणी कामगारांची 'उचल' एक दृष्टिक्षेप | प्रा. कदम डी. के. | 128 |
| 26. भारतीय ग्रामीण विकासाचे महत्त्व | शेळके सुदर्शन कि.<br>प्रा. शेळके एस. आर. | 133 |
| 27. महाराष्ट्रातील किसान क्रेडिट कार्ड योजनेचे मुल्यांकन | प्रा. डॉ. बिरादार बी. एम. | 138 |
| 28. अध्यापक शिक्षण व समाज निर्मितीत शिक्षकाची भूमिका | प्रा. डॉ. म्हस्के विशाखा पां. | 142 |
| 29. दडपणाशिवाय अध्ययन | प्रा. शेख यास्मीन सुलतांना | 145 |
| 30. पुरुषप्रधानता आणि भारतीय स्त्रियांचे शिक्षण | प्रा. पिंपळे सुशील | 148 |

Research Paper In Sociology

International Monthly Research Journal, Akshardeep

128

ISSN 2278-8204
Vol.II. Issue : I,
July, 2013

# ऊस तोडणी कामगारांची 'उचल' एक दृष्टिक्षेप

प्रा.डी.के.कदम
समाजशास्त्र विभाग प्रमुख
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर ता.हिमायतनगर जि.नांदेड

ग्रामीण समाजातील बहुसंख्य लोकांना साखर उद्योगाने रोजगार उपलब्ध करुन दिला आहे. महाराष्ट्रात सहकारी साखर कारखानदारी शेती विकासाच्या दृष्टीने एक योग्य मार्ग ठरला आहे. देशातील जास्तीत जास्त लोकसंख्येला शेतीतूनच रोजगार उपलब्ध होतो. कृषि हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. कृषि क्षेत्राचे आर्थिक विकासात अतिशय मोलाचे योगदान आहे. शेती हाच ग्रामीण समाजाच्या विकासासाठी महत्वाचा घटक असून, ग्रामीण समाजातील लोकांच्या उदरनिर्वाहाचे ते एकमेव साधन आहे.

ग्रामीण भागात शेतकऱ्याबरोबरच शेतमजूर, अलुतेदार, बलुतेदार व इतरही अन्य घटक शेतीवर अवलंबुन आहेत.

ग्रामीण समाजातील अनेक कुटुंबात शेती नाही. त्या कुटुंबातील लोकांना दुसऱ्याच्या शेतीवर मजुरीने काम करावे लागते, परंतु भारतीय शेती हंगामी मान्सूनच्या पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे शेत मजूरांना शेतीत कायमचा सातत्याने रोजगार मिळत नाही. त्यामुळे काही लोक ऊस तोडणीच्या कामासाठी जातात. कधीही ऊस तोडणी कामगारांचा आणि कारखान्याचा प्रत्यक्ष संबंध येत नाही. ऊस तोडणीसाठी त्यांना मुकादमामार्फत जावे लागते. साखर उद्योगाच्या प्रक्रियेत साखर कारखाने, शेतकरी व शेतमजूर यांचा जवळचा संबंध आहे. कारण आजही साखर कारखान्याकडे ऊस तोडणीसाठी कामगाराशिवाय पर्याय नाही. म्हणून साखर उद्योगाच्या प्रक्रियेत ऊस तोडणी कामगारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शेतीतील ऊस तोडणी पासून ते कारखान्यापर्यंत ऊसाची वाहतूक करण्यात यांचा सहभाग महत्वाचा आहे. ऊस तोडणी वेळेवर करणे, ऊस वेळेवर कारखान्यावर पोहचवणे अतिशय आवश्यक असते. कारण ऊस वेळेवर साखर कारखान्यावर पोहचला नाही तर परिणामी शेतकरी व साखर कारखाना या दोघांचेही नुकसान होते. कारण ऊस अधिक काळ सुकल्यामुळे त्याचे वजन घटते आणि साखरेचा उतारा कमी येतो. यासाठी योग्यवेळी ऊस तोडणी व वाहतूक करण्यासाठी ऊस तोडणी कामगार हा महत्वाचा घटक आहे.

"भारताचा साखरेचा सरासरी उतारा ९.९८% आहे तर महाराष्ट्रात साखरेचा उतारा ११.०५% आहे."

उत्तर प्रदेश आणि उत्तरेकडील काही राज्यात शेतकरी स्वत: ऊस तोडणी व वाहतूक करतात. त्यामुळे साखर कारखान्यावर शेतकऱ्यांची गर्दी होते. ऊसाचे वजन वेळेवर होत नाही तेंव्हा ऊस वाळतो (सुकतो) ऊसातील साखरेचे प्रमाण कमी होते. परिणामी साखरेचा उतारा

International Monthly Research Journal, Akshardeep

ISSN 2278-8204
Vol.II. Issue : I,
July, 2013

कमी होतो. महाराष्ट्रात ऊस तोडणी व वाहतूक ही कारखान्यावर कामगारामार्फत पोहचतो परिणामी महाराष्ट्रात साखरेचा उतारा जास्त येतो. म्हणून साखर उद्योगाच्या उत्पादन वाढीत ऊस तोडणी कामगारांचे महत्त्व आहे.

महाराष्ट्रातील सहकारी व खाजगी साखर कारखाने ग्रामीण समाजाच्या विकासाची महत्वाची केंद्रे ठरली आहेत.

'महाराष्ट्रातील बहुसंख्य साखर कारखान्याची सामाजिक बांधिलकीची जाणिव ठेवून ग्रामीण भागाच्या विकासाचे कार्य चालू ठेवले ग्रामीण भागातील मजुरांच्या हाताला म्हणजे उदरनिर्वाहाला काम दिले आहे.' २

महाराष्ट्रातील साखर कारखान्यांनी सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून ग्रामीण भागात सामुदायिक विवाह, साखर शाळा, शेतकऱ्यांना सुलभ कर्ज पुरवठा, शेती उत्पादनासाठी लागणारे ट्रॅक्टर साखर कारखान्यांना मिळणाऱ्या नफा यातून विविध शैक्षणिक सोयी उदा. प्राथमिक शिक्षणापासून ते पदवी पर्यंत, अभियांत्रिकी, वैद्यकिय सेवा, दवाखाने, प्रसुती गृहे, कुटुंब नियोजन केंद्रे, दत्तक कुस्तीगीर योजना दत्तक कुस्तीगीरांना आर्थिक मानधन देऊन खेळाडूंचा बहुमान करुन त्यांना नौकरी देणे यासारखी विविध सामाजिक कार्ये करीत आहे. त्याचबरोबर साखर कारखान्यामुळे कारखाना परिसरात हॉटेल्स, बेकरी, स्पेअर पार्टस, किराणा दुकान इत्यादींचा विकास झाला. साखर कारखान्यामुळे ग्रामीण भागापर्यंत सहकार चळवळ पोहचली. नवनवीन बि-बियाण्यांच्या संशोधनामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले ऊस वाहून नेण्यासाठी रस्ते बांधणीचे काम झाले. त्यामुळे ग्रामीण भागात दुग्ध व्यवसाय, कुक्कुट पालन यासारख्या व्यवसायांची सुरूवात झाली. परिणामी ग्रामीण भागातील लोकांना रोजगार मिळाला. ऐरवी ज्या मजुरांना केवळ सुगीच्या हंगामापुरता रोजगार मिळायचा त्या मजुरांना कापणी नंतर रोजगार मिळत नसे परंतु त्या कामगारांना साखर कारखान्यांमुळे कापणी (सुगी) नंतरच्या काळात रोजगार मिळू लागला.

ग्रामीण भागामध्ये शेतीवर अवलंबुन असणाऱ्या शेतमजुरांची स्थिती अतिशय वाईट आहे. ग्रामीण भागातील शेतमजुरांना हंगामात मजुरी मिळते. हंगाम संपला की, मजुरांना काम नसते त्यामुळे शेतमजूर ऊस तोडणीच्या कामासाठी जिल्हयात, जिल्हयाबाहेर, राज्याबाहेर स्थलांतरीत होतात. ऊस तोडणीचे काम हे हंगामी स्वरुपाचे असल्यामुळे ऊस तोडणी कामगारांना मिळणारा रोजगार उदरनिर्वाहासाठी पुरेसा नाही. त्यामुळे ऊस तोडणीचे काम करणारी कुटुंबे आपला सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्तर टिकवून ठेवू शकत नाहीत. त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. ऊस तोडणी कामगार ऊस तोडणीच्या कामाला जाण्यापूर्वी ऊस तोडणीच्या कामाचा करार करुन काही अनामत रक्कम घेतो ही अनामत रक्कम घेणाऱ्या कामगारांचे प्रमाण सर्वाधिक आहे.

नांदेड जिल्हयातील ऊस तोड कामगारांचे सर्वेक्षण केले असता असे निर्दशनास येते की, कंधार, लोहा, मुखेड या तालुक्यातून ऊसतोड कामगारांची संख्या सर्वाधिक असून त्या

खालोखाल नायगांव, उमरी, भोकर, बिलोली, मुदखेड, अर्धापुर, हदगांव, किनवट, धर्माबाद इत्यादी तालुक्यातून सुध्दा कमी अधिक प्रमाणात ऊसतोड कामगार आहेत.

प्रस्तुत शोध निबंधात नांदेड जिल्हयातील ऊस तोडणी कामगारांची 'उचल' या अनुषंगाने आढावा घेण्यात आला आहे.

अध्ययनसाठी संशोधन पध्दतीचा वापर करणे महत्वाचे असते. प्रस्तुत शोध निबंध पूर्ण करण्यासाठी समाजशास्त्रीय संशोधन पध्दतीचा वापर करुन ऊस तोडणीची 'उचल' समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**२) उद्दिष्टये :**

१) साखर उद्योगाचा अभ्यास करणे.

२) साखर उद्योगातील कामगारांची भूमिका समजून घेणे.

३) ऊस तोडणीच्या 'उचली' चा अभ्यास करणे.

**३) संशोधन आराखडा :** प्रस्तुत शोध निबंधासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरला आहे.
**तथ्यसंकलन : तंत्र व पध्दती :** प्रस्तुत संशोधनासाठी तथ्यसंकलनासाठी प्राथमिक स्त्रोत Primary Data आणि व्दितीय स्त्रोत Secondary Data या स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक स्त्रोतामध्ये मुलाखत अनुसुचीचा उपयोग करण्यात आला. कामगारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन माहिती प्राप्त केली. प्राथमिक स्त्रोतात निरीक्षण तंत्राचाही वापर करण्यात आला.

दुय्यम स्त्रोतामध्ये संशोधन विषयाशी संबंधित लिखीत साहित्य यामध्ये अध्ययनाविषयी संबंधीत ग्रंथ, साप्ताहिके, पाक्षीके , दैनिक, साखर संघाचे अहवाल, प्रबंध इत्यादीचा आधार घेतला आहे.

साखर उद्योगात ऊस तोडणी कामगारांची भूमिका अतिशय महत्वाची आहे. महाराष्ट्रातील साखर उद्योग ऊस तोडणी कामगारांवर अवलंबून आहे. महाराष्ट्रात जसा जसा साखर कारखानदारीचा विकास घडून आला तशी तशी ऊस तोडणी कामगारांची संख्या वाढली. नांदेड जिल्हयामध्ये ऊस तोडणी कामगारांना स्वत:च्या मालकीची शेती नाही.

ज्या कामगारांना शेती आहे. ती अल्प आणि कोरडवाहू आहे. नांदेड जिल्हयातील मोठया प्रमाणावर शेती मान्सुनच्या पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे या कामगारांना गावात कायमस्वरुपाचा रोजगार मिळत नाही. त्यामुळे ऊस तोडणीच्या कामासाठी जाणाऱ्या कामगारांची संख्या जास्त आहे. ऊस तोडणी कामगार असंघटीत क्षेत्रातील कामगार आहे. त्यांचा प्रत्यक्ष साखर कारखान्यांशी सबंध येत नाही ते कामगार फक्त मुकादमावर विश्वास ठेवून ऊस तोडणीसाठी जातात. ऊस तोडणी कामगारांचे काम अत्यंत कष्टाचे असते. जेंव्हा गावात काम मिळत नाही तेंव्हा ऊस तोडणीच्या कामासाठी मुकादमाकडून उचल घेऊन आपल्या गावात उदरनिर्वाह तसेच इतर कार्य करतात. ऊस तोडणीसाठी गेल्यावर ऊस तोडणीच्या कामासाठी त्यांनी घेतलेली उचल, उचलीचे स्वरुप इत्यादीचा अभ्यास केला आहे.

International Monthly
Research Journal,
Akshardeep



ISSN 2278-8204
Vol.II, Issue : I,
July, 2013

ऊसतोडणी कामगार हे शेती कामगार आहेत. परंतु ऊसतोडणीच्या हंगामात साधारणत: चार ते पाच महिने मुकादमामार्फत ऊसतोडणीसाठी स्थलांतर करतात. मुकादम साखर कारखान्याकडून उचल घेऊन ऊसतोडणी कामगारांना त्यांच्या काम करण्याच्या ऐपतीप्रमाणे उचल देतो. ऊसतोडणी कामगार पूर्णत: मुकादमावर अवलंबून असतो. ऊसतोडणी कामगारावर मुकादमाचे नियंत्रण असते. कामगारांच्या संदर्भात प्रत्यक्ष कोणतीही जबाबदारी साखर कारखाना घेत नसल्याचे दिसून येते.

ऊसतोडणी कामगार ऊसतोडणीच्या हंगामापूर्वी ऊसतोडणीस जाण्याच्या उद्देशाने स्वत: होऊन लेखी किंवा तोंडी स्वरुपाचा करार करुन मुकादमाकडून, गाडीमालकाकडून जी ऊसतोडणीच्या कामाची अनामत रक्कम, घेतो त्यास ऊसतोडणीच्या कामाची 'उचल' असे म्हणतात.

ऊसतोडणीच्या कामाची उचल देण्याची प्रक्रिया ही औपचारिक पध्दतीने होते. साखर कारखाना सर्वप्रथम गाडीमालकाकडून गाडीच्या कागदपत्राचे गहाणखत करुन घेऊन म्हणजेच ट्रक, ट्रॅक्टर ऊस वाहतुकीचे वाहन साखर कारखान्याचे नावे करतो. त्यानंतर साखर कारखाना अंदाजे ३ लाख ते ४ लाख रुपये अनामत रक्कम गाडी मालकाला देतो. त्यासाठी दुसऱ्या दोन गाडी मालकाचा जामीन घेतला जातो. गाडीमालक आपल्या विश्वासातील एका मुकादमामार्फत ही रक्कम उचल रुपाने कामगारांना देतो. उचल घेतांना ऊसतोडणी कामगार, गाडीमालक आणि मुकादम हे तिघे जन एकत्र असतात. मुकादम पूर्ण स्वत:वर जबाबदारी घेऊन ऊसतोडणी कामगारांना उचलीचे वाटप करतो. कांही ठिकाणी ठेकेदार सुध्दा कमिशन घेऊन साखर कारखान्यांना ऊसतोडणी कामगार पुरविण्याचे काम करतो. परंतु हे प्रमाण नगन्य आहे.

मुकादम ही उचल ऊसतोडणी कामगारांच्या काम करण्याच्या ऐपतीप्रमाणे देतो. दोघांची जोडी म्हणजे 'एक कोयता' असे म्हटले जाते. एका कोयत्यास जवळपास २० हजार ते ४५ हजारापर्यंत रक्कम दिली जाते. ही उचल कमी जास्त असू शकते.

ऊसतोडणीला कामाची उचल घेणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. उचल न घेणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण अतिशय कमी आहे. ऊसतोडणीच्या कामासाठी मुकादमाकडून उचल घेणाऱ्याचे प्रमाण सर्वाधिक ७१.२५ टक्के आहे. वाहन मालकाकडून उचल घेणाऱ्याचे प्रमाण हे अतिशय कमी आहे.

ऊसतोडणी व्यवसायात साखर कारखाना गाडीमालकाला उचल देतो. गाडीमालक मुकादमाच्या मध्यस्थीने ऊसतोडणी कामगारांना उचल देण्याचे काम करतो. प्रत्यक्षात मात्र मुकादमास ऊसतोडणी व्यवसायात अतिशय महत्व आहे. मुकादमामार्फत सर्वाधिक कामगारांना उचल दिली जाते. त्यामुळे कामगारांना मुकादमावर अवलंबून राहावे लागते.

ऊसतोडणीच्या कामासाठी उचल घेणाऱ्या कामगारांचे प्रमाण जास्त आहे. ऊसतोडणी कामगार उचल घेतांना किंवा मुकादमाकडून त्यांना उचल देतांना ऊसतोडणी कामगार आणि मुकादम, वाहन मालक यांच्यात लेखी करार किंवा तोंडी करार होत असतो. लेखी करार करुन

International Monthly
Research Journal,
Akshardeep



ISSN 2278-8204
Vol.II. Issue : I,
July, 2013

उचल घेणाऱ्या कामगारांचे प्रमाण जास्त आहे. ऊसतोडणी कामगार लेखी करार करुन देतांना मानसिक ताणतणावात असतो. प्रत्यक्ष अध्ययन करतांना असे लक्षात आले की, ऊसतोडणी कामगारावर दबाव राहावा, तो काम करतांना गावाकडे पळून जाऊ नये यासाठी मुकादम बॉंड (मुद्रांक) पेपर त्यांच्याकडून लेखी करार करुन त्यांच्या मनात भिती निर्माण करतो. तोंडी करार करणाऱ्या कामगारांनी मुकादमाचा पूर्ण विश्वास संपादन केल्याचे दिसून येते.

परंतु कांही वेळा ऊसतोडणीची केलेली उचल त्यांचेकडून परतफेड होत नाही. त्यावेळी मुकादमाकडून उचलीवर व्याज लावले जात नाही असे सांगणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण जास्त आहे. परंतु मुकादमाने ऊसतोडणी कामागाराला जी उचल दिलेली असते त्या उचलीचा हिशोब व्यवस्थित ठेवता येत नाही. कारण ऊसतोडणी कामगार अशिक्षित, अज्ञानी असल्यामुळे मुकादमकडे व्यवहार लिखीत स्वरुपात असतो. ऊसतोडणी कामगारांचे 'जीवन हे उचल घेणे, उचलीची परतफेड करणे व परत उचल घेणे' या दुष्टचक्रात ऊसतोडणी कामगार अडकलेले दिसून येतात. सर्वाधिक ऊसतोडणी कामगार हे उदरनिर्वाह भागविण्यासाठी आपल्या व्यवाहारीक अडचणीसाठी ऊसतोडणीच्या कामाची उचल घेतांना दिसून येतात.

**संदर्भ :**

१) तुप्पे एस.डी. सहकारी कारखाने आणि ग्रामीण बदल, व्दारका प्रकाशन मानतीरी पार्क, कोथरुड पुणे - २९ १९९२.

२) पाटील श्या.म.ऊस उत्पादन कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयनगर, पुणे - ३०

३) श्री गहनीनाथ ल.भोरे, पाटील (अध्यक्ष) महाराष्ट्र राज्या ऊसतोडणी, वाहतूक व मुकादम कामगार युनियन पाथर्डी जि.अहमदनगर.

४) प्रत्यक्ष अध्ययन क्षेत्रातील मुलाखत अनुसुची नांदेड जिल्हा २०११-१२